# महाराष्ट्र विधानपरिषद

## विधानपरिषद आश्वासन समितीचा
## अहवाल क्रमांक १९४

(सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

(दिनांक        डिसेंबर, २०१७ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपुर.
२०१७.

# महाराष्ट्र विधानपरिषद

## विधानपरिषद आश्वासन समिती

(२०१७-२०१८)

# अहवाल क्रमांक १९४

(सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांसंबंधीचा अहवाल)

(दिनांक       डिसेंबर, २०१७ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला)

(दोन)

## महाराष्ट्र विधानपरिषद आश्वासन समिती

## (२०१५-२०१६)

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १५ मे, २०१५ रोजी समितीवर नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची यादी :-

| अनु.क्र. | सदस्यांचे नाव |
| --- | --- |
| १) | श्री.रामनाथ मोते, वि.प.स. तथा समिती प्रमुख |
| २) | श्री.मितेश भांगडिया, वि.प.स. |
| ३) | श्री.गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स.*** |
| ४) | श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स. |
| ५) | श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. |
| ६) | श्री.ख्वाजा बेग, वि.प.स. |
| ७) | श्री.सुभाष झांबड, वि.प.स. |
| ८) | डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. |
| ९) | श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| | विशेष निमंत्रित |
| १०) | श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स. |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.यु.के.चव्हाण, सचिव
(३) श्री.म.मु.काज, सह सचिव (२)
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, उप सचिव
(५) श्री.संतोष पराडकर, अवर सचिव
(६) श्री.संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(७) श्रीमती सु.र.देसाई, कक्ष अधिकारी

**टिप:- ***सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीवरील रिक्त जागेवर श्री.गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजी नामनियुक्ती केली आहे.**

(तीन)

# महाराष्ट्र विधानपरिषद आश्वासन समिती

## (२०१७-२०१८)

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक **०६ सप्टेंबर, २०१७** रोजी समितीवर नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची यादी :-

| अनु.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| **१)** | प्रा. अनिल सोले, वि.प.स.तथा समिती प्रमुख |
| **२)** | डॉ. परिणय फुके, वि.प.स. |
| **३)** | श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. |
| **४)** | ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. |
| **५)** | श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स. |
| **६)** | श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. |
| **७)** | प्रा. जनार्दन चांदूरकर, वि.प.स. |
| **८)** | श्री. शरद रणपिसे, वि.प.स. |
| **९)** | श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. |
| | **विशेष निमंत्रित** |
| **१०)** | श्री.संजय दत्त, वि.प.स. |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, उप सचिव
(४) श्री.संतोष पराडकर, अवर सचिव
(५) श्री.सायली कांबळी, अवर सचिव

**अनुक्रमणिका**


| **अनु-क्रमांक (१)** | **विषय (२)** | **पृष्ठ क्रमांक (३)** |
|---|---|---|
| १ | **प्रस्तावना :** | **सात** |
| | विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या विवरणपत्रांची संख्या | |
| | विवरणपत्रे सभागृहास सादर करण्यास मंत्रालयीन विभागांकडून होत असलेला विलंब .. .. .. | |
| | मंत्रालयीन विभागांकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या विवरणपत्रासोबतची सहपत्रे .. .. .. | |
| २ | **परिशिष्टे** | |
| | **परिशिष्ट एक**.-- सन २०१७-२०१८ च्या गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समिती ने समितीच्या कार्यकालात वगळलेली आश्वासने | |
| | **परिशिष्ट दोन**.-- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहेत त्यांचे क्रमांक व विभाग. | |
| | **परिशिष्ट तीन**.-- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील, तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनातर्फे करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय दर्शविणारे विवरण. | |
| | **परिशिष्ट चार**.-- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काहींच्या पूर्ततेसाठी विभागाने काढलेले शासन आदेश, निर्णय, परिपत्रक किंवा पत्रक व प्रत्येक कागदपत्रे/दस्तऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या प्रत्येक कागदपत्राच्या शिरोभागी नमूद केलेले आहे. | |
| | **परिशिष्ट पाच.--** सन १९९० चे तिसरे अधिवेशन ते सन २०१७ चे दुसरे अधिवेशन या कालावधीत सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी पूर्तता न झालेल्या प्रलंबित आश्वासनांच्या विवरणपत्रांची वर्ष व अधिवेशननिहाय आणि विभागनिहाय सांख्यिकीय स्थिती दर्शवणारी यादी. | |
| | **परिशिष्ट सहा**.-- महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रावर समितीने ज्या तारखेला विचार केला त्या बैठकींचे कार्यवृत्त. | |

## प्रस्तावना

मी, आश्वासन समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन समितीचा **१९४ वा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे. हा अहवाल मुख्यत्वे सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेली आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधी समितीला सादर केलेल्या विवरणपत्रांची समितीने केलेली छाननी यासंबंधीचा आहे. समितीने माहे १४ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत झालेल्या बैठकांमध्ये सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या विवरणपत्रांच्या छाननीचे काम एकूण **पाच** बैठकांमध्ये पूर्ण केले आहे.

**सन २०१५-२०१६ साठी गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समितीने खाली नमूद केलेल्या मंत्रालयीन विभागांच्या सचिवांची साक्ष आयोजित केली होती :-**

| अ.क्र. | विभागाचे नाव | साक्षीचा दिनांक |
|---|---|---|
| १) | शालेय शिक्षण विभाग | ०८ नोव्हेंबर, २०१६ |
| २) | नगरविकास विभाग | १५ नोव्हेंबर, २०१६ |

**उपरोक्त मंत्रालयीन विभागांच्या यथास्थिती अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, सन १९९४ पासूनच्या प्रलंबित आश्वासनांपैकी बहुतांश आश्वासने कालबाह्य झाली होती, काही आश्वासनांची विभागांकडून पूर्तता करण्यात आली होती तथापि, त्याबाबतीत संसदीय कार्य विभाग किंवा विधानमंडळ सचिवालयास विभागांकडून कळविण्यात आले नव्हते. परिणामी, विभागांकडील प्रलंबित आश्वासनांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत होते. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या माध्यमातून प्रलंबित आश्वासनांचा पाठपुरावा करण्याची योजना आश्वासन समितीने हाती घेतल्यानंतर दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या आश्वासनांकडे विभागांचे लक्ष वेधण्यात आले व त्यायोगे एकप्रकारे विभागांमध्ये जागृती व सतर्कता निर्माण होऊन सभागृहात शासनाकडून देण्यात आलेली आश्वासने जनतेच्या प्रश्नांशी निगडीत असल्याने त्यांना वेळीच न्याय देणे कसे आवश्यक आहे याची विभागांना जाणीव झाली.**

**तसेच, प्रलंबित आश्वासनांच्या विषयांची समितीने छाननी करुन त्यावरील कार्यवाही प्रलंबित का राहिली याबाबत समोरा-समोर विचारणा केल्याने प्रलंबित आश्वासनांचा निपटारा करण्यात किंबहुना, कार्यवाहीस वेळ लागणार असल्यास त्याबाबत विहित कालावधीत कार्यवाही पूर्ण करण्यास विभागांना भाग पाडण्यात समितीला यश आले, हे नमूद करण्यास समितीला आनंद वाटतो.**

**समितीच्या एकूण कामकाजात समितीवरील सदस्यांनी बैठकींना उपस्थित राहून व कामकाजात अभ्यासपूर्ण योगदान देऊन समितीच्या कामकाजाला न्याय दिल्यानेच प्रलंबित आश्वासनांचा निपटारा**

**करणे समितीला शक्य झाले. तसेच, शासनाचे मुख्य सचिव, अप्पर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांनी समितीच्या हाकेला प्रतिसाद देऊन व स्वत: लक्ष घालून प्रलंबित आश्वासनांचा झपाटयाने निपटारा करण्यास समितीला प्रत्यक्ष सहभागाने सहकार्य दिले त्याचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. अशाप्रकारे प्रशासन व कार्यकारी संस्थेच्या सहकार्यातून खऱ्या अर्थाने लोकाभिमुख शासन प्रणाली नांदू शकेल असा मला विश्वास आहे.**

**परिशिष्ट "एक"** मध्ये सन २०१७-२०१८ च्या गठीत करण्यात आलेल्या विधानपरिषद आश्वासन समिती ने समितीच्या कार्यकालात वगळलेली आश्वासने. **परिशिष्ट "दोन"** मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली आहेत त्यांचे क्रमांक व विभाग. **परिशिष्ट "तीन" मध्ये** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील, तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनातर्फे करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय दर्शविणारे विवरण. **परिशिष्ट "चार"** मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी काहींच्या पूर्ततेसाठी विभागाने काढलेले शासन आदेश, निर्णय, परिपत्रक किंवा पत्रक व प्रत्येक कागदपत्रे/दस्तऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या प्रत्येक कागदपत्राच्या शिरोभागी नमूद केलेले आहे. **परिशिष्ट "पाच"** मध्ये सन १९९० चे तिसरे अधिवेशन ते सन २०१७ चे दुसरे अधिवेशन या कालावधीत सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी पूर्तता न झालेल्या प्रलंबित आश्वासनांच्या विवरणपत्रांची वर्ष व अधिवेशननिहाय आणि विभागनिहाय सांख्यिकीय स्थिती दर्शवणारी यादी. **परिशिष्ट "सहा"** मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रावर समितीने ज्या तारखेला विचार केला त्या बैठकींचे कार्यवृत्त.

समितीने उक्त अहवालाच्या प्रारुपावर दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत विचार केला व तो संमत केला.

**विधान भवन, मुंबई.**
दिनांक : १४ नोव्हेंबर, २०१७.

**समिती प्रमुख,**
**विधानपरिषद आश्वासन समिती.**

# अहवाल

हा अहवाल सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात देण्यात आलेली आश्वासने व त्या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मंत्रालयीन विभागांकडून समितीला सादर करण्यात आलेल्या विवरणपत्रांवर समितीने केलेल्या छाननी संबंधीचा आहे.

१. सन २०१४ च्या पहिल्या अधिवेशनात शासनाने दिलेल्या ३८ **एकूण** ३१ आश्वासनांपैकी आश्वासनांवर व सन २०१४ च्या दुसऱ्या अधिवेशनात शासनाने दिलेल्या ३२९ **एकूण** २४३ आश्वासनांपैकी आश्वासनांवर शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची विवरणपत्रे माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवली, ती पुढीलप्रमाणे :-

**सन २०१४ चे पहिले व दुसरे अधिवेशन**

**सभागृहाच्या पटलावर ठेवलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रांचे दिनांकनिहाय क्रमांक व आश्वासनांची संख्या**

| अ.क्र. | अधिवेशन वर्ष | सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचा दिनांक | आश्वासन क्रमांक | एकूण आश्वासने |
|---|---|---|---|---|
| **१.** | **सन २०१४ चे पहिले** | **१३ जून, २०१४** | ८, १०, २३ | **३** |
| **२.** | **सन २०१४ चे पहिले** | **१७ डिसेंबर, २०१४** | १, २, ११, १३, १७, २४, २५, २६, २७, २८, २९, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, | **१७** |
| **३.** | **सन २०१४ चे दुसरे** | **१७ डिसेंबर, २०१४** | २७, २८, ३१, ३६-अ, ८०, ८१, ८२, ८८, ८९, ९०, ९५ ९६, ९७, १०६, १०९, १११, ११४, १२४, १२६, १३५, १३९, १४१, १७६, २०२, २०६, २०८, २०९, २१०, २१३, २२७, २२८, २२९, २३०, २३१, २३७, २४९, २७२, २७३, २७६, २७९, ३१५, ३१९, ३२४ | **४३** |
| **४.** | **सन २०१४ चे पहिले** | **०८ एप्रिल, २०१५** | ५, २० | **२** |
| **५.** | **सन २०१४ चे दुसरे** | **०८ एप्रिल, २०१५** | २, ४, १०, १२, २०, ४०, ४२, ५४, ५५, ५६, ६४, ६५, ७६, ८४, ९९, १०३, १२१, १२५, १४०, १४२, १४४, १४६, १४९, १६०, १६५, १७४, १७५, १८७, १९२, १९३, २१९, २२०, २२२, २४१, २४२, २४५, २५१, २५२, २५३, २५३-अ, २५४, २५८, २६४, २७५, २७८, २८०, २८४, २८९, ३०९, ३१०, ३१२, ३१३, ३२३ | **५३** |
| **६.** | **सन २०१४ चे पहिले** | **१७ जुलै, २०१५** | १२, १५, १९, २१, ३१ | **५** |
| **७.** | **सन २०१४ चे दुसरे** | **१७ जुलै, २०१५** | ७, १३, १४, १५, १६, १७, १८, ३०, ३९, ४१, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५९, ६३, ७५, ८३, ११२, ११६, ११९, १२३, १२७, १३०, १४५, १५९, १७०, १९९, २०७, २३२, २३३, २३९, २४०, २४४, २५५, २५६, २५७, २७४, २९०, २९९, ३००, ३०४, ३०५, ३०६, ३०७, ३०८, ३२५ | **४८** |
| **८.** | **सन २०१४ चे पहिल** | **१५ डिसेंबर, २०१५** | ९, ३० | **२** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **९.** | **सन २०१४ चे दुसरे** | **१५ डिसेंबर, २०१५** | ५, ६, ११, २१, २२, २४, २५, २९, ३२, ३४, ३५, ३८, ४५, ४६, ४७, ५७, ५८, ६०, ६२, ११०, ११३, ११५, ११७, १३४, १३७, १६१, १८८, १८९, १९०, १९१, १९४, १९५, १९६, १९८, २१६, २१७, २२१, २२३, २२५, २५९, २८५, २८६, २८७, ३००-अ | **४४** |
| **१०.** | **सन २०१४ चे दुसरे** | **०१ एप्रिल, २०१६** | १, ८, ९, ६७, ७०, ७१, १५२, १५३, १५४, १५५, १५६, १५७, १५८, १६९, १७१, १७२, १८२, १८३, २०३, २१२, २२४, २४३, २६३, २६९, २७०, २७१, ३२१ | **२७** |
| **११.** | **सन २०१४ चे दुसरे** | **०३ ऑगस्ट, २०१६** | ४३, ६१, १०८, १३१, १३६, १६६, १६७, १६८, २३५, २६७, २६८, २८८, ३०१, ३०२, ३२० | **१५** |
| **१२.** | **सन २०१४ चे दुसरे** | **०८ डिसेंबर, २०१६** | २३, ३७, ७८, १४३, २१५, २१८, २६६, ३०३ | **८** |
| **१३.** | **सन २०१४ चे पहिले** | **१० मार्च, २०१७** | ६ | **१** |
| **१४.** | **सन २०१४ चे दुसरे** | **१० मार्च, २०१७** | २५०, २८२ | **२** |
| **१५.** | **सन २०१४ चे पहिले** | **३१ जुलै, २०१७** | १४ | **१** |
| **१६.** | **सन २०१४ चे दुसरे** | **३१ जुलै, २०१७** | १२०, १५१, २१४ | **३** |
| | | | **एकूण आश्वासने** | **२७४** |

**१.३ सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनामधील आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीसंबंधात हा अहवाल तयार करत असताना उपरोक्त कालावधीत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे समितीने विचारात घेतली आहेत.**

२. **विवरणपत्रे सादर करण्यास होत असलेला विलंब :-**

२.१ **सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनामधील आश्वासनांच्या कार्यवाहीचे विवरणपत्र मंत्रालयीन विभागांकडून विहित मुदतीत म्हणजे ९० दिवसांच्या आत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेले नाही.**

२.२ आश्वासनांची पूर्तता जास्तीत जास्त ३ महिन्यांच्या कालावधीत शासनाने केली पाहिजे व त्या कालावधीत आश्वासनांची पूर्तता करता येत नसल्यास त्यासाठी होणाऱ्या समर्थनीय विलंबाची कारणे समितीस कळविण्याबाबत तसेच विलंब टाळण्याच्या दृष्टीने घ्यावयाच्या दक्षतेबाबत समितीने मागील अहवालांमध्ये प्रत्येक वेळी आपल्या तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत. आश्वासन पूर्ततेच्या

सर्वसाधारण विलंबाबाबत तत्कालिन माननीय पीठासीन अधिकारी यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २००२ रोजी तत्कालिन माननीय संसदीय कार्यमंत्री, माननीय संसदीय कार्य राज्यमंत्री, मा. समिती प्रमुख, आश्वासन समिती, विधानसभा/विधानपरिषद तसेच प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग यांची याबाबत एकत्रित बैठक बोलाविली होती. याबाबत मुख्य सचिव यांनी अधिक लक्ष घालण्याबाबत या सचिवालयाकडून दिनांक १६ सप्टेंबर, २००२ रोजी अर्धशासकीय पत्र पाठविण्यात आले होते. तसेच त्या-त्या विभागासही कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन मुख्य सचिवांनीही मंत्रालयीन सर्व विभागांच्या अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांना पत्र पाठवून त्यांच्या संबंधीत विभागांकडील प्रलंबित आश्वासनांचा त्वरीत निपटारा करण्याचे निदेश दिले होते. अशा रितीने विधानमंडळ सचिवालय व राज्याच्या मुख्य सचिवांनी पाठपुरावा केल्यामुळे बऱ्याच विभागांकडून प्रलंबित आश्वासने शून्यावर आणण्याचा किबंहुना काही विभागांकडून निम्मेअधिक प्रलंबित आश्वासनांचा निपटारा करण्याचा निश्चित प्रयत्न झाला. तथापि, तरीही अद्याप अनेक विभागांकडून विहित मुदतीत आश्वासनांची पूर्तता केली जात नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. **पुन्हा एकदा समिती सर्व मंत्रालयीन विभागांचे लक्ष वेधून अशी शिफारस करते की, आश्वासनावरील कार्यवाहीची पूर्तता विहित मुदतीत म्हणजे ९० दिवसांच्या आत करण्याची दक्षता घेण्याचे काटेकोर पालन सर्व मंत्रालयीन विभागांकडून करण्यात यावे. तसेच जर सदर आश्वासनांवरील कार्यवाहीची पूर्तता ९० दिवसांच्या आत करता येत नसेल तर त्यासाठी होणाऱ्या समर्थनिय विलंबाची कारणे नमूद करण्यात यावीत.**

**२.३ सन २०१५-२०१६ च्या आश्वासन समितीने दिलेल्या निदेशानुसार आश्वासनांची पुर्तता विहित मुदतीत व परिपूर्णपणे करण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्याच्या सुचना संसदीय कार्य विभागाकडून दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये तसेच मा. मुख्य सचिव महोदयांच्या स्मरणपत्र दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व विभागीय सचिवांना देण्यात आल्या आहेत.**

**३. शासकीय कार्यवाहीच्या विवरणपत्रांबाबतची सहपत्रे:-**

सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या आश्वासनांसंबंधीच्या कार्यवाहीची विवरणपत्रे पाठविताना आश्वासनासोबत मंत्रालयीन विभागांकडून करण्यात आलेल्या कायर्वाहीची सहपत्रे जोडलेली असतात. सदरहू सहपत्रे अहवालाच्या परिशिष्ट (४) मध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

---

## परिशिष्ट एक

सन २०१७-२०१८ या वर्षात खालील प्रमाणे आश्वासने वगळण्याचे निर्णय समितीने घेतले.

---

## परिशिष्ट एक

## सन २०१७-२०१८ या वर्षात खालील प्रमाणे आश्वासने वगळण्याचे निर्णय समितीने घेतले.

| अ.क्र. | सन / आश्वासन क्रमांक | विभागाचे नाव | बैठकीचा दिनांक | समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|
| १) | सन २०१५ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक १९९ | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २) | सन २०१५ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ८६५ | कृषी व पदुम विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| ३) | सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ४४९ | नगरविकास विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| ४) | सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक १४७ व १६६ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| ५) | सन २०१६ च्या पाचव्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ७१ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| ६) | सन २०१६ च्या पाचव्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३६ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| ७) | सन २०१७ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ७० | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| ८) | सन २०१७ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक १५५ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| ९) | सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ५०८ | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| १०) | सन २०१६ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक २७५ | महसूल व वन विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| ११) | सन २००२ च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ११२ | सार्वजनिक आरोग्य विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| १२) | सन १९९४ च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक १३२ | महसूल व वन (पुनर्वसन) विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| १३) | सन २०१६ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक १३८ | गृह विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| १४) | सन २०१० च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक १७० | महसूल व वन (पुनर्वसन) विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| १५) | सन २०१६ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक १८८ व १८९ | महसूल व वन विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| १६) | सन २०१५ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक २२० | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| १७) | सन २०१५ च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३६ व २७८ | महसूल व वन विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८) | सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३२८ | अन्न व नागरी पुरवठा विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| १९) | सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३८७ | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २०) | सन २००९ च्या चौथ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ५७० | महसूल व वन (वन) विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २१) | सन २०१३ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ५८१ व ५८३ | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २२) | सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३८१ | नगरविकास विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २३) | सन २०१५ च्या दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३०० | महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २४) | सन २०१५ च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ८७ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २५) | सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक ३३१ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ०३ ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २६) | सन २०१६ च्या पहिल्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक २४० | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | १० ऑक्टोबर, २०१७ | **मान्य** |
| २७) | सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासन क्रमांक १३ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ०१ नोव्हेंबर, २०१७ | **मान्य** |
| २८) | सन २०१६ च्या पाचव्या (हिवाळी) अधिवेशनातील आश्वासन क्रमांक २०० | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ०१ नोव्हेंबर, २०१७ | **मान्य** |

---

**परिशिष्ट दोन**

ज्या आश्वासनांच्याबाबतीत शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर अहवालाच्या दिनांकापर्यंत ठेवण्यात आली, ती आश्वासने.

**(अहवालातील परिच्छेद क्रमांक २.२ पहावा)**

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या प्रलंबित आश्वासनांवरील कार्यवाहीची विवरणपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली त्यांचे क्रमांक व विभाग परिशिष्टात दर्शविण्यात आले आहेत.**

---

# परिशिष्ट दोन
## अहवाल क्रमांक १९४ मधील सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनातील विभागनिहाय आश्वासने

| अ.क्र. | विभाग | आश्वासन क्रमांक |
|---|---|---|

### सन २०१४ चे पहिले

| | | |
|---|---|---|
| १. | नियोजन विभाग | १, २ |
| २. | अन्न व नागरी पुरवठा विभाग | ५ |
| ३. | नगर विकास विभाग | ६, २८ |
| ४. | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ८, ३६, ३७ |
| ५. | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | १०, ११, १२ |
| ६. | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | १३, १४ |
| ७. | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १५ |
| ८. | गृह विभाग | १७, ३० |
| ९. | महसूल व वन विभाग | १९, २१, ३३, ३४, ३५ |
| १०. | सामाजिक न्याय व विशेष सहाय | २०, २६ |
| ११. | महिला व बाल विकास | २३ |
| १२. | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | २४ |
| १३. | आदिवासी विकास विभाग | ९, २५ |
| १४. | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | २७ |
| १५. | पर्यावरण विभाग | २९ |
| १६. | वित्त विभाग | ३१, ३२ |

| अ.क्र. | विभाग | आश्वासन क्रमांक |
|---|---|---|

## सन २०१४ चे दुसरे

| | | |
|---|---|---|
| १) | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | १,८,९,१३४,१३९,१४२ |
| २) | उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | २,६५,२१७,२२० |
| ३) | सार्वजनिक आरोग्य विभाग | ४,८३,८४,१३६,१३७,१८२,१८३ |
| ४) | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग | ५,६,२१,२२,२५,२९,३१,३२,३४,३५,११६,१२७,२१५,२१६,२१९,२२१,२३२,२८५,२८८,३००-अ,३०४,३०५,३०६,३०७,३०८,३१५ |
| ५) | पर्यावरण विभाग | ७,१०,११,१२,८०,८१,८२ |
| ६) | जलसंपदा विभाग | १३,१४,१५,१६,१७,१८,८८,८९,९०,२३७ |
| ७) | गृह विभाग | २०,६७,७६,९५,११३,११४,१३०,१४१,१४३,१४४,१५२,१५३,१५४,१५५,१५६,१५७,१५८,१६१,१६५,१६६,१६७,१६८,१६९,१७१,१७२,१७४,१७५,१९४,१९५,१९६,१९८,२०८,२०९,२१०,२६४,२६६,२६८,२६९,२७०,२७१,२८२ |
| ८) | उच्च व तंत्र शिक्षण | २३,२८,३०,६१,११५,१२६,२२२,२८४,२८६,२८७,३०९,३१० |
| ९) | ग्रामविकास व जलसंधारण विभाग | २४,१०९,१९२,२१२ |
| १०) | महिला व बाल विकास विभाग | २७,२२९,२३०,२३१,३१२,३१३ |
| ११) | सामाजिक न्याय व विशेष सहाय | ३६-अ,३९,११०,१११,१२३,१३५,१८७,१८८,१८९,१९०,१९१,२३९,२४२,२४३,२४४,२५९ |
| १२) | आदिवासी विकास विभाग | ३७,३८,५७,५८,५९,६०,७८,११७,२४५ |
| १३) | महसूल व वन विभाग | ४०,४१,४२,४३,४५,४६,४७,४९,५०,५१,५२,५३,५४,५५,५६,१३१,१५१,१७०,२३३,२३५,२४०,२४१,२५०,२५५,२५६,२५७,२५८,२९०,३१९ |
| १४) | सार्वजनिक बांधकाम विभाग | ६२,७०,७१,१४५,१४६,१५९,१६०,२७६,२७८,२७९,३०३ |
| १५) | कृषी व पदुम विभाग | ६३,६४,१२५,१४९,२५१,२५२,२५३,२५३-अ,२५४ |
| १६) | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ७५,९६,९७,३२४ |
| १७) | सामान्य प्रशासन विभाग | ९९,१२१ |

| | | |
|---|---|---|
| **१८)** | नगरविकास विभाग | १०३,१९३,२०७,२१४,२६७,२८०,२८९,२९९,३००,३०१,३०२,३२५ |
| **१९)** | मराठी भाषा विभाग | १०६,३२३ |
| **२०)** | गृहनिर्माण विभाग | १०८,१२०,२०२,२०३,२०६,२६३,३२०,३२१ |
| **२१)** | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ११२,२१३ |
| **२२)** | विधी व न्याय विभाग | ११९ |
| **२३)** | पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग | १२४ |
| **२४)** | वित्त विभाग | १४० |
| **२५)** | नियोजन विभाग | १७६,२१८,२४९,२७२,२७३,२७४,२७५ |
| **२६)** | अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभाग | १९९ |
| **२७)** | अल्पसंख्यांक विकास विभाग | २२३,२२४,२२५ |
| **२८)** | रोजगार व स्वयंम रोजगार विभाग | २२७,२२८ |

## परिशिष्ट तीन
## (आश्वासनांसंबधीचे विवरण)

---

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनाकडून सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांचा क्रमांक, आश्वासन दिल्याचा दिनांक व संदर्भ, आश्वासनांचा विषय व तपशील तसेच आश्वासनपूर्तीबाबत शासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही व त्यावरील समितीचे अभिप्राय.**

---

# सन २०१४ चे पहिले अधिवेशन

| अधिवेशन वर्ष | आश्वासन क्रमांक | एकूण आश्वासने |
|---|---|---|
| सन २०१४ चे पहिले | १,२,५,६,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१७,१९,२०,२१,२३,२४,२५,२६, २७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७ | ३१ |

# सन २०१४ चे दुसरे अधिवेशन

| अधिवेशन वर्ष | आश्वासन क्रमांक | एकूण आश्वासने |
|---|---|---|
| सन २०१४ चे दुसरे | १,२,४,५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,२०,२१,२२,२३,२४, २५,२७,२८,२९,३०,३१,३२,३४,३५,३६-अ,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,४५, ४६,४७,४९,५०,५१,५२,५३,५४,५५,५६,५७,५८,५९,६०,६१,६२,६३,६४,६५, ६७,७०,७१,७५,७६,७८,८०,८१,८२,८३,८४,८८,८९,९०,९५,९६,९७,९९, १०३,१०६,१०८,१०९,११०,१११,११२,११३,११४,११५,११६,११७,११९, १२०,१२१,१२३,१२४,१२५,१२६,१२७,१३०,१३१,१३४,१३५,१३६,१३७, १३९,१४०,१४१,१४२,१४३,१४४,१४५,१४६,१४९,१५१,१५२,१५३,१५४, १५५,१५६,१५७,१५८,१५९,१६०,१६१,१६५,१६६,१६७,१६८,१६९,१७०, १७१,१७२,१७४,१७५,१७६,१८२,१८३,१८७,१८८,१८९,१९०,१९१,१९२, १९३,१९४,१९५,१९६,१९८,१९९,२०२,२०३,२०६,२०७,२०८,२०९,२१०, २१२,२१३,२१४,२१५,२१६,२१७,२१८,२१९,२२०,२२१,२२२,२२३,२२४, २२५,२२७,२२८,२२९,२३०,२३१,२३२,२३३,२३५,२३७,२३९,२४०,२४१, २४२,२४३,२४४,२४५,२४९,२५०,२५१,२५२,२५३,२५३-अ,२५४,२५५, २५६,२५७,२५८,२५९,२६३,२६४,२६६,२६७,२६८,२६९,२७०,२७१,२७२, २७३,२७४,२७५,२७६,२७८,२७९,२८०,२८२,२८४,२८५,२८६,२८७,२८८, २८९,२९०,२९९,३००,३००-अ,३०१,३०२,३०३,३०४,३०५,३०६,३०७,३०८, ३०९,३१०,३१२,३१३,३१५,३१९,३२०,३२१,३२३,३२४,३२५ | २४३ |

---

# परिशिष्ट चार
## शासन आदेश, शासन निर्णय, परिपत्रके व पत्रक

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या शासनाकडून सभागृहात देण्यात आलेल्या प्रलंबित आश्वासनांपैकी कार्यवाही करण्यात आलेल्या आश्वासनांबाबतीत विभागांकडून काढण्यात आलेले शासन आदेश, शासन निर्णय, परिपत्रके यासारखे सर्व दस्ताऐवज/कागदपत्रे
या परिशिष्टांमध्ये समाविष्ट आहेत.संबंधित दस्ताऐवज कोणत्या आश्वासनांशी संबंधित आहेत हे त्या कागदपत्रांच्या दस्तऐवजांच्याशिरोभागी नमूद केले आहे.

---

---

# परिशिष्ट- पाच
## प्रलंबित आश्वासनांची अधिवेशननिहाय व विभागनिहाय विवरणे
## (अहवालाचा परिच्छेद क्रमांक २.२ पहावा)

**सन १९९० चे तिसरे अधिवेशन ते सन २०१७ चे दुसरे अधिवेशन या कालावधीत सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी पूर्तता न झालेल्या प्रलंबित आश्वासनांच्या विवरणपत्रांची वर्ष व अधिवेशननिहाय आणि विभागनिहाय सांख्यिकीय स्थिती दर्शवणारी यादी**

---

---

## परिशिष्ट- सहा

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेल्या आश्वासनांवरील कार्यवाहीच्या विवरणपत्रावर समितीने ज्या तारखेला विचार केला त्या बैठकींचे कार्यवृत्त**

---

# पहिली बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक मंगळवार, दिनांक २२ जून, २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती

१) श्री. रामनाथ मोते, वि.प.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. संजय दत्त, वि.प.स.

३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) श्री. म.मु.काज, सह सचिव (२)

२) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव

**संसदीय कार्य विभाग**

श्री.सु.अ.देशपांडे, सह सचिव

या बैठकीत समितीने सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची विवरणपत्रे विचारात घेऊन त्यावर अभिप्राय व्यक्त केले.

# दुसरी बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक मंगळवार, दिनांक २८ जून, २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती

१) श्री. रामनाथ मोते, वि.प.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.

३) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) श्री. म.मु.काज, सह सचिव (२)

२) श्रीमती.देसाई, कक्ष अधिकारी

**संसदीय कार्य विभाग**

१) श्री.र.स.सरफरे, अवर सचिव

या बैठकीत समितीने सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची विवरणपत्रे विचारात घेऊन त्यावर अभिप्राय व्यक्त केले.

# तिसरी बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक बुधवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती

१) श्री.रामनाथ मोते , वि.प.स. तथा समिती प्रमुख

२) श्री.नरेद्र पाटील, वि.प.स.

३) श्री.संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(२) श्रीमती.देसाई, कक्ष अधिकारी

**संसदीय कार्य विभाग**
श्री.सु.अ.देशपांडे, सह सचिव

या बैठकीत समितीने सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची विवरणपत्रे विचारात घेऊन त्यावर अभिप्राय व्यक्त केले.

# चौथी बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक मंगळवार, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१७ रोजी दुपारी ११.३० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

## उपस्थिती

१) प्रा.अनिल सोले, वि.प.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. गोपिकिशन बाजोरीया, वि.प.स.

३) श्री.जनार्दन चांदूरकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, उप सचिव

**संसदीय कार्य विभाग**

श्री.पाताडे, कक्ष अधिकारी

या बैठकीत समितीने सन २०१४ च्या पहिल्या व दुसऱ्या अधिवेशनातील आश्वासनांवर शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची विवरणपत्रे विचारात घेऊन त्यावर अभिप्राय व्यक्त केले.

# पाचवी बैठक

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक मंगळवार, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

१) प्रा. अनिल सोले, वि.प.स. तथा समिती प्रमुख
२) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.
३) श्री. जगन्नाथ शिंदे, वि.प.स.
४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
५) श्री. शदर रणपिसे, वि.प.स.
६) श्री. संजय दत्त, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, उप सचिव**

**संसदीय कार्य विभाग**
**श्री. वानखेडे, उप सचिव**

या बैठकीत समितीने आपल्या **१९४ व्या** प्रारुप अहवालावर विचार करुन तो संमत केला.